# निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट, १८८१



प्रामाणिक कर्जदार / जामिनदार ज्या बँकेमध्ये / पतसंस्थेमध्ये आपण जेवढा चेक देतो त्यापेक्षा अधिक रक्कम शिल्लक आहे अशी खात्री असेल त्याबाबतीत ती लागू होते. खात्यात शिल्लक नसताना चेक देणे किंवा एखादा माल अथवा सेवा घेऊन समोरच्या व्यक्तीस /संस्थेस चेक देणे, सदरचा चेक बँकेत भरल्यानंतर तो परत येणे म्हणजे चेक घेणाऱ्याची फसवणूक करणे होय. एखादयाने बँकेत शिल्लक नसताना समोरच्यास काही कारणास्तव चेक सादर केला व तो चेक परत आला म्हणजेच त्या चेकचा स्वीकार न झाल्यामुळे तो **डिसऑनर** झाला. ह्या प्रकारास निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ च्या कलम १३८ कलम ७ व कलम १४१ मधील तरतुदी आपोआप लागू होतात. **खात्यात शिल्लक नाही किंवा खाते बंद केले याचा अर्थ असा की चेक देणाऱ्याचा हेतू फसवणूक करण्याचा आहे असा होतो.**

**निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ हा देवाण घेवाणीच्या दस्तासंबंधीचा कायदा आहे.** या कायद्यामध्ये कलम १३८ ते १४७ अन्वये चेक परत आल्यास चेक देणाऱ्यावर फौजदारी कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच या कारवाईत तडजोड करून प्रकरण मिटवण्यावाचीही कलम १४७ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. **कलम १४३ ते १४७ अन्वये स्वत:च्या बँक खात्यात अपुरी शिल्लक असताना दिलेला चेक परत आल्यास दंडासंबंधी तरतुदी आहेत.** त्याची अंमलबजावणी त्या त्या स्तरावर केली जाते. बँकेच्या नियमाप्रमाणे खात्यात किमान किती शिल्लक असणे आवश्यक असते हे ठरलेले आहे. चेक परत करतेवेळी तो निरनिराळ्या कारणास्तव परत येतो, म्हणजेच **कलम १३८ च्या कारणास्तव बँकेत पैसे शिल्लक नाहीत या कारणास्तव परत आल्यास तो चेक "डिसऑनर"होतो व ह्या कायदाच्या तरतुदी नुसार हा गुन्हा ठरला जातो.** इतर कुठल्याही कारणास्तव चेक परत आला तर सध्याच्या निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट अंतर्गत ती कृती गुन्हात मोडेल किंवा कसे याचा स्पष्ट खुलासा कायद्यात दिलेला नाही. **म्हणून चेक परत आल्यास नेमके काय करावे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे .**

**एकदा चेक परत आला तर १५ दिवसाचे आत ज्यांनी चेक दिला त्यास बँकेने दिलेल्या पत्राची नक्कल जोडून नोटीस देणे आवश्यक आहे.** तसेच ठरलेल्या मुदतीत रकमेच्या भरणा न केल्यास त्याबाबत फौजदारी खटला प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी यांच्या कडे करता येतो. **परंतु पोलिस खाते अशा प्रकारच्या गुन्हाची दखल घेत नाहीत कारण अशा प्रकारचा एफ.आय.आर. नोंदवण्याची**

**कायद्यात तरतूद नाही.** म्हणून अशा प्रकारचा खटला प्रथम वर्ग न्यायीक दंडाधिकारी किंवा महानगर दंडधिकाऱ्याकडेच दाखल करणे आवश्यक असते.

चेक परत जाणे हा अपराध एका स्थानिक क्षेत्रात केला असेल व काही अंशी दुसऱ्या स्थानिक क्षेत्रात केला असेल तर दोन्हीपैकी एका स्थानिक क्षेत्रात अधिकार असलेल्या न्यायालयात खटला दाखल करता येतो. **चेक परत गेल्यास त्यासंदर्भात नोटीस लेखी असणे आवश्यक आहे. या नोटीसीच्या समक्ष स्थळप्रतीवर सही घेवून किंवा रजिस्टर पोस्टाने बजावणे आवश्यक आहे .** चेक देणारा व शेरा मारणारा जर मयत असले व नोटीस देणाऱ्यास ते माहीत असेल तर मृताचे वैध प्रतीनिधीस नोटीस देता येईल. तसेच नादारी घोषित केल्याप्रसंगी दोघांनाही तसेच त्यांच्या विश्वस्तांना नोटीस देणे आवश्यक असते. दिलेल्या नोटीसीचा योग्य तो पुरावा योग्य रीतीने नोटीस दिली असेल असे समजण्यात यावे.

**कर्ज वसुलीसाठी दिलेल्या पुढील तारखेचा चेक देणे म्हणजेच पोस्ट डेटेड चेक देणे होय.** आणि त्या पोस्ट डेटेड चेक बाबत काही नियम लागू आहेत. ते म्हणजे चेकवर असलेल्या तारखेत ते बँकेत वसूलीसाठी भरणा करता येतो. तसेच चेक दिल्यापासून ३ महिन्याच्या आत बँकेत भरणा केला पाहिजे. याचाच अर्थ सदरचा चेक ३ महिन्यापर्यंत वटवण्याची मुदत चेक घेणाऱ्यास मिळते.

न वटलेल्या धनादेशाबाबत आर.बी. आय .चे धोरण ठरलेले आहे .स्टॉक मार्केट स्कॅमचे नॉईन्ट पार्लमेन्टरी कमिटीच्या शिफारशीस अनुसरून भारतीय रिझर्व्ह बँकेने न वटलेल्या धनादेशच्या बाबतच्या सुचनाचा पुर्नविचार करून, न वटता परत आलेल्या धनादेशांबाबत पुर्वी दिलेल्या सुचनांशिवाय खालील अतिरिक्त सुचना काढलेल्या आहेत. आणि या सुचनांची पुर्तता लेखापरिक्षक तसेच बँकांचे कार्यकारी मंडळासमोर प्रथम ३० जून २००३ रोजी त्यानंतर प्रत्येक तिमाहिस ठेवण्याचे आदेश दिलेले आहे.

१) रक्कमा अदा करण्याचा बँकांनी न वटलेले चेक क्लिअरिंग नियमाचे काटेकोर पणे पालन करण्यात एक संस्था आवश्यक आहे. धनादेश परत आल्या नंतर ताबोडतोब धनादेश भरण्यास अगर धनादेश धारण करणाऱ्यास धनादेश परत करणे आवश्यक आहे.

२) धनादेशाची रक्कम देणाऱ्या बँकांकडे धनादेशाच्या रक्कमेचा निपटारा दोन बँकांच्या खात्यात परत आल्यास ती रक्कम बँकेत अगर धनादेश धारण करणाऱ्यास ताबोडतोब परत करणे आवश्यक आहे.

३) जे धनादेश शिल्लक रक्कम असतांना परत येतात, ते परतीच्या आदेशात 'खात्यात शिल्लक अपुरी 'असा शेरा देवून परत करणे अवश्यक आहे. बँकांचे उपभोक्तांना शिस्त लावण्यासाठी बँकांनी धनादेश वापरणाऱ्या खातेदारांना अट घातली पाहिजे की, १ कोटी रक्कमेच्या धनादेश विशिष्ट खात्यात परत आल्यास अगर असे एका वर्षात ४ वेळा रक्कम शिल्लक नसल्याने दनादेश परत आल्यास त्या खातेदारास नावे धनादेशाची पुस्तिका दिली जाऊ नये, बँकानी अशी चालू खाती बंद करण्याचा निर्णय घ्यावयाचा आहे .

अशी कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट खाती चालू ठेवायाची किंवा नाहीत याच्या आवश्यकतेचा विचार बँकानी करावा .या बाबत बँकानी खालील दक्षता घ्यावायची आहे :-

१) या बाबत संबंधीत धनादेश सवलत मंजुरी करणाऱ्या अधिकाऱ्याशिवाय इतर वरिष्ठ अधिकाऱ्याने करावयास पाहिजे.

२) नवीन धनादेश पुस्तीका देते वेळेस बँकानी संबधितांना लेखी पत्र देऊन सूचना देण्यात याव्यात की रू १ कोटी व त्यावरील धनादेश परत आल्यास खात्यात शिल्लक नसताना, धनादेश १ वर्षात ३ वेळा न वटता धनादेशांचे खातेदांराना लेखीसुचना देण्यात यावी.

३) विशिष्ट खात्यात विशिष्ट वर्षात धनादेश तिसऱ्या वेळेस न वटता परत आल्यास बँकेने दिलेल्या चेकची सुविधा काढून घेण्यात येईल. अशी लेखी सुचना खाती बंद करण्याबाबत दिली पाहिजे.

बँकेने काय करावे ? याबाबतची अपेक्षा -

१ ) न वटलेल्या परत आलेल्या धनादेशाबाबत न्यायालयाच्या कंझ्युमर फोरम अगर इतर न्यायालयात अगर सक्षम अधिकाऱ्यासमोर बँकांनी चेकधारकास चेक परत आलेल्या पुराव्याबाबतचे दस्त व पुराव्याबाबत संपूर्ण सहकार्य घ्यावे.

२) दर तिमाहीस बँकांनी त्यांच्या लेखापरिक्षकांना तसेच कार्यकारी मंडळापुढे १ कोटी व त्यापेक्षा जास्त रकमेचे परत आलेल्या धनादेशांची संकलित माहिती ठेवायची आहे.

बँक खालीलप्रमाणे कारवाई करु शकते :-

बँकांनी / पतसंस्थांनी आपल्या कार्यकारी मंडळाचे संमतीने न वटता परत आलेल्या धनादेशाबाबत योग्य ती कार्यपद्धतीबाबत संस्थेच्या कर्मचारी वर्गाने व इतर धनादेश काढलेल्या इसमांबरोबर संगनमत अगर धनादेश करणाऱ्या संगनमत होणार नाही याबाबत योग्य ती कार्यपद्धती ठरविण्यात यावी. अशी धनादेशाची रक्कम प्राप्त करता अगर ज्याच्या ताब्यात धनादेश आहे त्यांना सदरचा परत आलेला धनादेश परत करण्याची कारवाई संस्थांनी करावयाची यासाठी संस्थांनी कर्मचारी वर्गासाठी याबाबत अंतर्गत मार्गदर्शन काढलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन करण्याबाबत सूचना काढणे आवश्यक असल्याने रिझर्व्ह बँकेने निर्देष दिलेले आहेत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**